मुद्रा यशोगाथा
नाव :- श्रीम.प्रतिभा अरुणराव जांभुळकर, जि.चंद्रपूर
व्यवसाय :- साडी विक्री व्यावसायिका

## पंतप्रधान मुद्रा बँक योजनेमुळे साडीविक्रीचा जोड धंदा मिळाला

लाभार्थ्यांचे मनोगत :- अंगणवाडी सेविका म्हणून मी काम करत होते. त्यामुळे अनेक गरीब महिलांशी माझा संपर्क नियमित येत होता. सुरुवातीपासून साडयांना पिकोफॉल लावण्याचा व्यवसाय मी करत होते. मध्यंतरी माझ्यावर आभाळ कोसळले. पतीच्या अकाली निधनानंतर मुलांच्या शिक्षणासाठी व घर चालविण्यासाठी पैशांची चणचण भासत होती. माझे नातेवाईक, भाऊ सर्वच माझ्या पाठीशी उभे होते. त्यांच्याकडून नियमित मला मदत होत होती. मात्र स्वत:च्या पायावर उभे राहून मला आपले घर चालविण्याची इच्छा होती. त्यासाठी अंगणवाडी सेविकेसोबतच काही छोटा-मोठा व्यवसाय करता आला तर अधिक चांगले होईल, असे मनात आले. माझ्या भावाने मला यासाठी आपण मुद्रा बँक योजनेकडे मागणी करु असे सांगितले. कर्ज घेऊन त्याची परतफेड करु शकू का? असा प्रश्न मला पडत होता. मी सुरुवातीला कर्ज न घेता सौंदर्यप्रसादने विकण्याचा व्यवसाय सुरु केला. मात्र पिकोफॉल लावतांना साडया विकण्याचे माझ्या मनात आले. भावाने मुद्रा बँकेबद्दल सांगितलेच होते. त्यामुळे एखदा घरोघरी जाऊन साडी विकण्याचा व्यवसाय करता येईल का ? याचा विचार केला आणि मग भावाच्या मदतीने बँकेशी संपर्क साधला. आता माझा व्यवसाय छान सुरु असून महिला माझ्याकडे साडया घेण्यासाठी नियमित येतात.

-------------